**Sunday, May 24, 2009**

**Mumbai to be smokefree**

Publication: Me Sudharak, Edition: Thane, Journalist: Bureau, Page No: 1 & 4, Location: Bottom-Right, Width(cms): 32, Height(cms): 11, Size(sq.cms): 352

# मुंबई होणार धुम्रपानमुक्त

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): राष्ट्रीय कायद्याद्वारे सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास मनाई करणारा कायदा लागू होऊन ६ महिने झालेले आहेत तसेच मुंबईत महत्वाकांक्षी धूम्रपान मुक्त मुंबई मोहीम सुरु होऊन ३ महिने गेले आहे - ज्याची सुरुवात ॲक्शन कौन्सिल अगेन्स्ट टोबॅको, इंडिया, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा पोलिस सेखसरिया इन्स्टिट्युट फॉर पब्लिक हेल्थ तसेच सलाम बॉम्बे फाऊंडेशन यांच्यासहित ख्यातिप्राप्त तंबाखू नियंत्रण संघटनांच्या संयुक्त प्रयासांद्वारे करण्यात आली होती.

जागतिक पातळीवर हॉस्पिटॅलिटी उद्योगाने धूम्रपान मुक्त पर्यावणाच्या संदर्भात एक महत्वाची भूमिका बजावली आहे. क्षेत्रीय हॉस्पिटॅलिटी असोसिएशन द्वारे सर्व यशस्वी धूम्रपान मुक्तींची सुरुवात करणाऱ्यांना भागीदारी तथा सहाय्याकरिता हार्दिक आमंत्रण त्यांनी देऊ केले आहे. मात्र मुंबईत जवळपास ७५०० संस्था आहेत ज्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ वॉर्डामध्ये पसरलेल्या आहेत.



२ ऑक्टोबर, २००८ पासून या संस्था धूम्रपान मुक्त वातावणाचे ध्येय साध्य करुन आहेत. एसोसिएशन ऑफ होटल्स एंड रेस्टॉरंट्स इन मुंबई (एएचएआर), जिसमें रेस्टॉरंट्स, बार आदी सहित ५००० हून अधिक सदस्य हे धूम्रपान मुक्त मुंबईकरिता एक यशस्वी उदाहरण सिध्द झाले आहेत.

टाटा मेमोरियल सेंटरचे प्रीवेंटिव ऑंकोलॉजीचे प्रोफेसर तथा विभाग प्रमुख डॉ. सुरेंद्र शास्त्री यांचे म्हणणे आहे की, धूम्रपान मुक्त मोहीम ही १६ महिन्यांची एक मोहीम आहे जिचे उद्दिष्ट मुंबई शहरातील सर्व सार्वजनिक जागा जसे रेस्टॉरंट्स, हॉटेल, बार, पब, कॉफी हाऊस,

पान ४ वर...

१) शहरात सुमारे८० टक्के, तर उपनगरांमध्ये ७० टक्के रेस्टॉरंट्स धूम्रपानमुक्त आहेत.
२) आरोग्याविषयी गंभीर बाब: इनडोअर सार्वजनिक ठिकाणी जिथे धूम्रपानाची परवानगी आहे ज्या ठिकाणची वायु गुणवत्ता (एअर क्वालिटी) डम्पिंग ग्राऊंडहूनही अधिक खराब आहे.
३) ८८ टक्के ठिकाणी नो-स्मोकिंग साइनेजमध्ये सर्वेक्षण करण्यात आले, मात्र केवळ ६४ टक्के ठिकाणीच त्याची उपस्थिती आढळून आली.
४) नो स्मोकिंग साइनेज हे कायद्याच्या निर्देशानुसार आकार व रंगानुसार आढळून आले नाहीत.
५) धूम्रपानाची परवानगी असलेल्या हुक्का रेस्टॉरंट्स तथा देशी दारुच्या ठिकाणी वायु गुणवत्ता अतिशय खराब आहे. यूएस पर्यावरण संरक्षण एजन्सीद्वारे निर्देशित केलेल्या आरोग्याकरिता हानिकारक स्तर २.५ पीएम मध्ये दर्शवलेल्या स्तराहून हा स्तर खूप अधिक आहे.

Next Page>>>